ह्मणाली–अरे तूं येथें कां उभा आहेस ? कृष्ण बोलला–थेरडे! आह्मीं रस्त्यावर खेळत आहों, तूं कां आह्मास दरडावितेस ? असें बोलून तिला तोंड वांकडें करून दाखवून पळून गेला.

नंतर कृष्ण दुपारीं नंदाबरोबर जेवल्यावर यशोदा मंचकावर येऊन निजली. इकडे राधा यमुनातिरावर पाण्यास येऊन श्रीकृष्णास आठवून स्फुंदस्फुंदून रडत ह्मणूं लागली कीं, हे मनवेधका ! तुझ्या चरणास मी अंतरलें, आतां यमुनाजीवनांत प्राण देतें. असें राधेचें अंतर जाणून मातेजवळून हळूच उठून, यमुनातिरावर आला. त्यावेळीं खरी दोन प्रहर झाली असल्यामुळें यमुनेवर कोणी नव्हतें. तेव्हांच श्रीकृष्ण तेथें येऊन राधेची निरी धरिली. राधा ह्मणाली–चक्रपाणी ! जनांत माझें नांवरूप बुडून माझ्या संसारावर पाणी पडलें; अशी तुझी करणी विपरीत होय.

इकडे यशोदा जागी होऊन, कृष्ण नाहीं असें पाहून शोधास निघून यमुनातिरावर आली. तिला राधेनें पाहतांच, कृष्णास ह्मणाली–ती पहा तुझी माय आली, आतां आह्मां दोघांस येथें ताडण करील. मग यशोदा जवळ येऊन हरीस ह्मणाली–अरे ! तुला इकडे येण्यास कसें वाटतें ? कृष्ण रडत ह्मणाला–मी रस्त्यावर खेळत असतां, हिनें माझा चेंडू पळविला ह्मणून मी हिच्या मागें आलों. तो माझा चेंडू देण्यास सांग.

असें बोलून लोळणी घेतली. तें ऐकून यशोदा राधेस ह्मणाली–कांगे तुह्मीं गोविंदास रडवितां आणि नसतेच त्याच्यावर आळ घालितां ? राधा ह्मणाली–मामीसें ! चेंडू मजजवळ नाहीं हा नसताच आळ घेतो. कृष्ण बोलला–आई ! हिचा झाडा घे ह्मणजे चेंडू निघेल पहा. असें ऐकून राधा हांसून वस्त्र झाडूं लागली तोंच कृष्णानें कौतुक करून, चेंडू खालीं पाडिला. तो पाहतांच राधा लज्जित झाली. तेव्हां माया ह्मणाली–तुह्मीं गौळणी नष्ट व्यभिचारिणी असून, माझ्या पांच वर्षांच्या बाळावर नसतेच आळ घेतां; त्यामुळें गोकुळ टाकून गेलें पाहिजे. नंतर यशोदेनें कृष्णास कडेवर घेऊन मंदिरांत आणलें व राधाही घागर भरून घरास गेली.

इकडे माय कृष्णास ह्मणाली–बाळा ! तूं बाहेर कोठें जाऊं नको, या गोकुळांतील सुंदरी तुजवर चोरीचाही आळ घालतात. असें सांगून ठेऊन, गौळणींस ह्मणाली–तुह्मीं श्रीहरी चोरी करितो ह्मणतां, तरी त्याला एकवेळ मुद्यावर धरून, माझेजवळ आणा. मग त्या गौळणी त्याला धरण्यास टपत असतां, एकीच्या घरीं गोरस भक्षण करतांना सांपडला. त्याला धरून रस्त्यावर आणलें आणि सर्व गौळणींस कृष्ण सांपडला, याला मातेजवळ नेऊं चला असें ती सांगूं लागली. त्याबरोबर सर्व गौळणी गोळा झाल्या. तों एकेकीच्या हातांत एकेक कृष्ण अशीं लक्षानु-

लक्ष स्वरूपें चोहोंकडे झालीं. अशा त्या कृष्णास धरून यशोदे-जवळ आल्या. तों यशोदेच्या कडेवर श्रीकृष्ण असून, सर्व ठिकाणीं व्यापला आहे असें दिसलें. घरांत, बाहेर, ओसरीवर, पाळण्यांत, डोल्हाऱ्यांत, आंगण्यांत अशा सर्व ठायीं कृष्णरूपें पाहून यशोदा व गौळणी तटस्थ होऊन देहभान विसरल्या; मग गाऱ्हाणीं कोठचीं ? नंतर हरीनें आपली योगमाया संपूर्ण झांकून एकटाच आईजवळ उभा राहिला. असें कौतुक पाहून गौळणी निमूटपणें घरीं गेल्या. असें कृष्णानें लाघव करून दाखविलें.

अध्याय ९ वा.

श्रीकृष्णाच्या बाललीला व यमलार्जुनोद्धार.

एके दिवशीं यशोदा प्रातःकाळीं उठून, श्रीकृष्ण निजला असतां, त्याच्या मुखावरील वस्त्र काढून मुख न्याहाळलें, तोंच ती तन्मय होऊन मुखावर लिंबलोण करती झाली. नंतर ती मंथन करण्याकरितां गेली. इकडे कृष्ण जागा होऊन आईजवळ येऊन रवीदंड धरून ह्मणाला—आई ! आधीं मला दूध दे. मग यशोदा तेथेंच त्याला पुढें घेऊन स्तनपान करवित होती. तिचें

चित्त माझेकडे आहे किंवा प्रपंच्याकडे आहे याची प्रचिती पाहण्याकरितां चुलीवर दूध तापत ठेविलें होतें तें कृष्णानें उतवून टाकिलें. तोंच दूध करपल्याचा वास यशोदेस येतांच, कृष्णास लोटून देऊन चुलीजवळ गेली. इकडे कृष्णानें मंथन डेरा फोडून, लहान मुलांस बोलावून नवनीताचे गोळे सर्वांस वाटले आणि उखळी पालथी घालून तीवर चढून शिंक्यावर ठेवलेलें लोणी व गोरसाचाही नाश केला.

दूध उतास गेलें त्याचा यशोदेला राग आलाच होता; ती मनांत ह्मणाली—मी आंत आलें परंतु बाहेर कृष्णानें काय करणी केली असेल नकळे ! असें बोलून हातांत वेताटी घेऊन बाहेर आली; तों कृष्ण उखळावरून उडी मारून पोरांस घेऊन दूर पळाला. आई येऊन पाहते तों डेरा फुटला असून, दहीं आंगण्यांत वाहून जाऊन लोण्याचाही नाश केला आहे; असें पाहून क्रोधानें कृष्णास धरावयास धांवली. परंतु तो तिच्या हातीं लागला नाहीं. शेवटीं धांवून श्रम पावतांच, कृष्णास करुणा येऊन, तिच्या हातांत सांपडला. तोंच आईनें वेत उगारला. तो पाहून कृष्ण वर हात करून रडूं लागला. यशोदेनें काठी उगारली परंतु तिच्यानें मारवेना. मग हातांत धरून आणून आतां तुला उखळास बांधून ठेवितें असें बोलली. तोंच तेथें गौळणी येऊन ह्मणाल्या—घट्ट बांधा या चोराला ! मग यशोदेनें

दावें आणून कमरेवाटोळें फिरवून उखळाजवळ बांधावयास नेलें; तेव्हां कृष्ण स्फुंदस्फुंदून रडत काकुळतीस येऊन ह्मणाला– आजपासून मी चोरी करणार नाहीं. तरी तें न मानून यशोदा दावें आणून बांधूं लागली पण तें पुरेना; ह्मणून दुसरें तिसरें अशीं नवलक्ष दावीं आणिलीं, परंतु तींही पुरलीं नाहींत. मग आतां बांधूं द्यावें असें कृष्णानें मनांत आणितांच दावें पुरलें. त्यावेळीं गौळणीं ह्मणूं लागल्या–अरे चोरा ! आतां कसें झालें? तूं पुष्कळांस पीडलेंस त्याचें उसनें आज मिळालें ! आतां कसा जाशील तें पाहूं ? नंतर यशोदेनें तुह्मीं आतां घरीं जा असें सांगतांच गौळणी आपापल्या गृहास गेल्या व मायाही मंदिरांत गेली.

मागें कृष्ण उखळ ओढित हळुहळू चालला असतां, नंदाच्या आंगण्यांत दोन प्रचंड वृक्ष होते ते यमलार्जुन नांवाचे पूर्वी नारदानें शापून वृक्षजन्मास घातले होते. ते कुबेराचे पुत्र नळ-कुबेर नांवाचे उन्मत्त अविचारी स्त्रियांसह नग्न होऊन जलक्रीडा करित असतां, तेथें नारदमुनी आले. त्यांनीं त्यांचा अविचार पाहून वृक्ष व्हाल ह्मणून शाप दिला. तो ऐकतांच त्यांनीं चरण धरून उःशाप मागितला. तेव्हां नारद ह्मणाला–तुह्मीं गोकुळांत वृक्ष व्हाल. ज्यावेळीं कृष्ण रांगत येईल तेव्हां तुमचा उद्धार करील.

त्यांचा उद्धार करण्याकरितां श्रीकृष्ण उखळ ओढीत त्यांच्या-

मधून जातांच, ते उपटून पडले व दोन पुरुष हात जोडून स्तवन करूं लागले. त्याचवेळीं ते ऊर्ध्वपंथानें स्वस्थानीं गेले. इतक्यांत नंद बाहेरून आला, त्यानें धांवा धांवा ह्मणून ओरडून वृक्ष-संधींत सांपडलेल्या कृष्णास उचलून घेतलें. यशोदाही हृदय पिटीत धांवत आली, व गोप गौळणींची नंदाच्या आंगण्यांत दाटी झाली. मायेनें हरीस कडेवर घेऊन ह्मटलें—मी कृष्णास बांधलें. जळोत हे माझे हात ! आज मोठा अनर्थ चुकला. नंद ह्मणाला—वाराही नसतां वृक्ष उपटून कसे पडले ? तेथें लहान मुलें होतीं तीं ह्मणालीं—कृष्णानें बळेंच वृक्ष पाडले, त्यांतून दोन पुरुष निघाले ते याचेजवळ कांहीं बोलून आकाशांत गेले. ही मुलांची गोष्ट खरी न वाटून सर्वजन हांसूं लागले. मग नंदानें मोठा सोहळा केला.

एके दिवशीं श्रीकृष्ण देव्हाऱ्याजवळ खेळत असतां, नंदाचे शालिग्राम गिळून टाकले. नंद देवपूजनास आला तों देव नाहींत ह्मणून यशोदेस विचारूं लागला. ती ह्मणाली—कृष्ण तेथें खेळत होता त्याला विचारा. तेव्हां नंदानें कृष्णास कडेवर घेऊन विचारलें. कृष्ण बोलला—मला माहित नाहीं; माझेवर आळ घालूं नका. नंदानें ह्मटलें, मी देवतार्चन केल्याशिवाय अन्न घेणार नाहीं. त्याचें तें निर्वाण पाहून, कृष्णानें असंख्य शालिग्राम, सूर्य, शक्ति, गणेश, शंकर, आदि

ब्रह्मांडरचना मुखांत दाखविली. ती पाहतांच नंदाचें मन हरि-रूपीं निमग्न झालें. मग हरीनें मायाजाळ काढून शालिग्राम दिल्यावर नंदानें पूजन करून, कृष्णासह भोजनास बसला.

एके दिवशीं यशोदा मंथन करित असतां, कृष्णानें तिच्या हातांतून रविदंड घेऊन मंथन आरंभिलें, तें कौतुक नंदयशोदा पाहूं लागलीं. परंतु वासुकी, कूर्म, शिव, लक्ष्मी यांस चिंता उत्पन्न झाली.

एके दिवशीं बारा सोळा गौळणी मिळून गोरस रक्षणाचा पुरुषार्थ करून एका घरांत गोरस सांठवून, कुलपें वगैरे लावून बंदोबस्त केला आणि आपण ओसरीवर राहिल्या. मग कृष्णानें संवगडी जमवून त्यांस सर्व वृत्तांत सांगून ह्मणाला—तुह्मीं सर्वांनीं डोळे झांका. त्याप्रमाणें करितांच हरीनें आपल्या मायेनें सर्व गड्यांस त्या घरांत नेऊन सर्व गोरस भक्षण करून भांडीं फोडून टाकिलीं व गोंगाट केला; तो ऐकतांच गौळणी चमकून कोणत्या दारानें गेला असें बोलत कित्येकजणी यशोदेस सांगावयास गेल्या. कांहींजणी आतां या पोरांस चांगली शिक्षा लावूं असें बोलूं लागल्या. तें ऐकतांच पोरें घाबरून कृष्णास शरण गेलीं. तेव्हां कृष्णानें सांगितलें—आतां पुनः नेत्र झांका ह्मणजे सर्वांस बाहेर नेतों. मग नेत्र मिटतांच सर्वांस झरोक्यांतून बाहेर

काढिलें; परंतु पेंद्यानें हरीची माया पाहण्याकरितां किंचित् नेत्र उघडलें तोंच तो साहाण्यांत लोंवत राहिला. तोंच गौळणींनीं दरवाजा उघडून त्याचे पाय सडकूं लागल्या. तेव्हां पेंद्यानें धांवा करितांच, कृष्णानें काढून नेलें.

इकडे गौळणी यशोदेस घेऊन येतांच, यशोदा ह्मणाली–चक्रपाणी कोठें आहे ? त्या ह्मणाल्या–तो करणी करून निघून गेला. यशोदा बोलली–सकाळपासून तो घरांत खेळत होता आणि तुमच्या घरीं कसा आला ? तुह्मीं गौळणी नाहीं तेच आळ घेतां ? तुमचें काय खाल्लें तें सांगा मी भरून देतें. मग सर्व भांडीं दाखविण्यास यशोदेस नेलें तोंच तीं जशींच्या तशीं भरलेलीं आहेत. तीं पाहतांच यशोदा बोलली–तुह्मीं नष्टा गौळणी नानाप्रकारचे आळ बाळावर घेतां, असें बोलून घरीं आली तों श्रीकृष्ण खेळत होता त्यास हृदयीं धरून मुखचुंबन केलें.

एके दिवशीं दोनप्रहरीं श्रीहरी एका गौळणीच्या घरांत शिरून दहीं दूध भक्षण करीत होता; तोंच ती येऊन त्याचें मणगट धरून, हातांत खापर देऊन यशोदेजवळ आणलें. त्याला आई ह्मणाली–कृष्णनाथा ! तूं हें काय केलेंस ? कृष्ण ह्मणाला–माते ! मी रस्त्यावर खेळत असतां, गोपाळांनीं मला बळेंच धरून नेलें. पण मी दूर उभा होतों, ते गोरस भक्षून पळाले व हिनें मला उगाच धरून, तोंडास

दहीं फांसून, मडकें हातांत देऊन तुजजवळ ओढून आणलें. चोरांस सोडलें आणि माझेवर आळ आणला! मग आईनें मुख पुसून, खापर भिरकावून दिलें. तेव्हां कृष्णानें गळ्यास मिठी मारिली.

एकदां कृष्णानें आईच्या गळ्यास मिठी मारून मला दूधभात जेऊं घाल ह्मणून सांगितलें. माता ह्मणाली–आतां पतिराज घरीं येतील त्यांच्याबरोबर जेव. तोंपर्यंत मी गोदोहन करितें. एके दिवशीं कृष्णानें सकाळींच दूध प्यावयास मागितलें. यशोदा ह्मणाली–आज रविवारीं सर्व दुधाचें खंडेराव दैवताचें अन्नकुट घालावयाचें आहे. कृष्णानें विचारलें तें दैवत कोठें आहे? माता बोलली–देव्हाऱ्यांत पहा जा. मग तो पाहावयास गेला तों देव दोरींत ओंवलेले पाहिले. तेव्हां आईस ह्मणाला–एवढें देवाचें सत्व सांगतेस मग ते दोरीनें आंवळून कां बांधले आहेत? तुझा देव काय करील? असें बोलून सर्व दूध पिऊन टाकलें.

दुसरे दिवशीं सकाळींच उठल्याबरोबर कृष्ण आईस ह्मणाला–माते! माझे डोळे दुखतात व मान वांकडी झाली आहे तरी मला कडेवर घे. यशोदा ह्मणाली–खंडेराव दैवतानें तुला प्रचिती दाखविली. मग देव्हाऱ्याजवळ नेऊन अंगारा लावून देवाची प्रार्थना केली. तोंच ह्माळसापती प्रगट होऊन यशोदेस ह्मणाला–हा त्रैलोक्यनाथ तुझ्या उदरीं आला असून, त्याच्या

अंगीं सर्व देव व आह्मीं दैवतें आहों. याची पूजा केल्यानें सर्व देव तृप्त होतात. असें सांगून खंडेराव गुप्त झाले.

एके दिवशीं कृष्ण ह्मणाला आई! आधीं मला जेऊं घाल. माता बोलली–देवपूजा करून मग जेऊं घालीन. श्रीहरीनें विचारलें–देव तरी किती आहेत? माता बोलली–खंडेराव, भैरव, गणेश असे आहेत. असें बोलतांच हांसून ह्मणाला–तर मग देवाधिदेवाला भज. माता ह्मणाली–तो आह्मांस कसा दिसेल. तोंच कृष्णानें चतुर्भुज मूर्ती प्रगट करून आईस दर्शन दिलें.

एकदां कृष्ण देव्हाऱ्यांतील मूर्तीस ह्मणाला–माझ्या आईला सांगा कीं, आधीं कृष्णास जेवण वाढ. मग आई देव्हाऱ्याजवळ येतांच धातुमूर्ती ह्मणाल्या–आधीं कृष्णास जेऊं घाल ह्मणजे तुझी पूजा आह्मांस पावली. असें ऐकतांच माया तटस्थ झाली.

एके दिवशीं कृष्ण ओसरीवर खेळत असतां, यशोदा ह्मणाली–बळराम वाहेर गेला आहे तों तूं दूध पी ये. हरी ह्मणाला–दूध प्यायल्यानें काय होतें? माता बोलली, शेंडी वाढते, अंग गोरें होतें. असें ऐकून प्रचिती पाहण्याकरितां दुधाची वाटी तोंडास लावून, हातांत शेंडी धरून, किती वाढली व अंग गोरें झालें कीं काय तें पाहूं लागला. आई बोलली–बाळ! आजच कशी वाढेल?

एके दिवशीं बळराम कृष्ण आंगणांत खेळत असतां, बळराम ह्मणाला–कृष्णा ! तुला कोंडा देऊन पोसणा घेतलेला आहे. कारण ! तुझीं आईबापें गोरीं व त्यांच्या पोटचा तो तूं काळा कसा ? ह्मणून ह्मणतों. तेव्हां कृष्ण रडूं लागला. मग आईनें त्याची समजूत केली.

एकदां माघस्नानानिमित्त गौळणी मोठ्या पहांटेस स्नानास गेल्या असतां कृष्णानें एकीच्या गाई रानांत सोडून लावून त्यांच्या जाग्यावर बैल बांधले. ती स्नानाहून आल्यावर भरणा घेऊन दूध काढण्यास गेली तों वृषण हातास लागूं लागले. ही करणी कृष्णाची असें जाणून, यशोदेजवळ गाऱ्हाणें आणिलें. मग माता काठी घेऊन पाठीस लागतांच, कृष्ण दूर पळूं लागला तोंच तिकडून नंद आला; त्यानें कृष्णास उचलून घेतलें. कृष्ण नंदास ह्मणाला–या धमकटी गौळणी आईजवळ लटकींच गाऱ्हाणीं सांगतात, तीं आईस खरीं वाटतात.

एके दिवशीं बळराम कृष्ण खेळत असतां, कृष्णाकडे डाव आला असें पाहून कृष्णानें बळरामाच्या दोन गड्यांच्या शेंड्या बांधून वृक्षावर लोंबत ठेविले. त्यांस बळरामानें येऊन सोडलें. ती खोडी आईस कळली. मग आई ह्मणाली–तुझ्या खोडी जाण्याकरितां एखादें शास्त्र तरी पढ. हरी बोलला–कोणाचें शास्त्र ? माता–देवाचें ! कृष्ण–शास्त्र पढल्यानें देव काय

देतो ? माता–मुक्ती देतो. हरी–ती तुलाच होऊं दे, मी नवनीताची चोरी कदापि सोडणार नाहीं. माता म्हणाली–तूं चोरी करणार नाहीं अशी आण घे पाहूं ! कृष्ण–माते ! गोरसावांचून चोरी करीन तर तुझी शपथ ! असें बोलतांच आई हांसूं लागली.

एके दिवशीं दहिंभात कालवून हरीपुढें ठेविला. तेव्हां कृष्ण मातेस म्हणाला–मला थोडें लोणचें दे. माता–तें सोवळ्यांत आहे; असें ऐकतांच लोळणी घेतली. मग सोंवळें विटाळून आलें निंब घातलें. एक गोकुळांतील म्हातारी सुनेला कृष्णाचा वारा लागूं नये म्हणून जपत होती. ती म्हातारी बाहेर गेलेली पाहून कृष्णानें तिच्या सुनेस जाऊन भोगिली. तोंच म्हातारीनें येऊन, दोघांस धरून रस्त्यावर ओढीत नेलीं आणि सांगूं लागली या दोघांस धरिलीं पहा. लोक म्हणूं लागले–म्हातारे! सूनपुत्रास कोठें नेतेस ? वृद्धा बोलली–हा कृष्ण तुम्हीं ओळखीत नाहीं ? असें बोलून नंदाच्या घरास आणिलीं. तों तेथें श्रीहरी खेळत होता. त्यास पाहतांच म्हातारीस आश्चर्य वाटलें. नंद तिला म्हणाला–सूनपुत्रास चावडीवर कां आणलेंस ? नंतर सर्वांनीं त्या म्हातारीचीं निर्भत्सना करतांच निमूटपणें घरीं गेली.

एकदां गोपिका कृष्णास कडेवर घेऊन यमुनातिरीं आल्या. तेथील नावाडी नाव बांधून घरीं गेले होते. मग गौळणींनीं नाव

पाण्यांत सोडून वल्हीं हातांत घेतलीं. ती होडी जुनी असल्या-मुळें आंत पाणी भरून वाहूं लागली. तेव्हां त्यांनीं कृष्णाची प्रार्थना करितांच, त्यांस ह्मणाला-चोळ्या वस्त्रें फेडून नावेच्या छिद्रांत कोंबा ह्मणजे पाणी बंद होईल. तसें त्यांनीं केलें तरी पाणी बंद होईना. त्याचवेळीं सूर्य मावळून पर्जन्य व वारा यांची सुरवात झाली, भयंकर लाटा उसळूं लागल्या. गोपिकांस गळ्यापर्यंत पाणी होतांच कृष्णास खांद्यावर उचलून घेतलें. नंतर मृत्यूची वेळ जवळ आली, असें जाणून, श्रीहरीची मूर्ती हृदयांत रेखिली, आणि जन्मोजन्मीं तुझें दर्शन घडावें असें बोलूं लागल्या. त्यांचें निर्वाण जाणून श्रीकृष्ण संतुष्ट होत्साता, पर्जन्य वारा बंद करून नाव तिरास लाविली व गोपिकांचीं वस्त्रें जशींच्या तशींच राखिलीं. मग त्या आनंदानें घरीं आल्या व कृष्णचरित्र यशोदेस सांगितलें.

अध्याय १० वा.

गोपाळकाला, खेळ खेळणें व ब्रह्मदेवगर्वहरण.

श्रीहरी पांच वर्षांचा होतांच, गोपी यशोदेस ह्मणाल्या—आतां गोविंदाला शिदोरी देऊन रानांत गाई राखावयास

घाडा. गांवांत राहिल्यानें चोऱ्या करील. नंतर श्रीहरी लहान-लहान गोपाळांसह घुमऱ्या, मोहऱ्या, पावे, टाळ, मृदंग इत्यादि वाद्यनादानें वनांत जावयास निघाला. गोपिका व यशोदा यांनीं गोपाळांसह श्रीहरीस गांवाबाहेर पोंचविलें.

मग श्रीहरीनें सोबत्यांसह यमुनेवर येऊन, अनेक प्रकारचे खेळ मांडिले; दोनप्रहर होतांच, सर्वांच्या शिदोऱ्या जमवून काला मांडला. मध्यें श्रीहरीस बसवून गोपाळ चक्राकार बसले. सर्वांनीं आपापल्या शिदोऱ्या हरीपुढें ठेविल्या. काला होत असतां पेंद्या उठून दुसऱ्या वृक्षाखालीं जाऊन बसला व गोपाळ फोडून आपणाकडे नेऊन श्रीहरीस एकटाच टाकिला. गोपाळ ह्मणाले—हृषिकेशी ! तुझ्या संगतीनें काय सुख आहे ? आह्मांस चौऱ्यांशीं फेरे फिरावयास जीवित्व दिलें आहेस. तूं निर्विकार होऊन आह्मांस विकार लाविले आहेस, तुझें बोलणें सर्वांस गोड लागतें व आमच्या बोलण्याला लोक हांसतात, इत्यादि अनेक प्रकारें बोलून सर्व पेंद्याकडे गेले. मग श्रीकृष्ण आपण होऊन त्यांचे जवळ जाऊन उभा राहिला. त्याला बळेंच लोटून लावूं लागले. तेव्हां काकुळतीस येऊन ह्मणाला—मी तुह्मांस विसंबणार नाहीं, तुह्मीं सांगाल तसा वागेन. मत्स्य कूर्मादि अवतार तुमच्या करितांच घेतले. असा मी सहाकारी असतां, मला लोटून कां लावितां ? असें बोल-

तांच नेत्रांतून अश्रू वाहूं लागले, तोंच पेंद्यानें जाऊन चरण धरले व गोपाळही आह्मीं ठकलों होतों असें बोलूं लागले.

असो. मग सर्वांनीं काला करून एकमेकांस कवळ देऊं लागले. गडी ह्मणाले–आधीं तूं ग्रास घे. कृष्ण ह्मणाला–तुमच्या अगोदर मी ग्रास घेणार नाहीं. गोपाळ ह्मणाले–तुझ्या आधीं आह्मीं ग्रास घेणार नाहीं. असें बोलतांच कृष्ण रुसून दुसरीकडे जाऊं लागला. तोंच गोपाळ पाय धरून, तुझेंच आह्मीं ऐकूं असें बोलूं लागले. नंतर प्रथम गड्यांस ग्रास देऊन, मागून आपण घेतला. अशाप्रकारें नित्य यमुनातिरावर काला होत असे. त्यांतील प्रसादाची इच्छा देवही करित होते. ते उच्छिष्ट प्रसादासाठीं कालिंदी जीवनांत मत्स्य होऊन राहिले. ती खूण श्रीकृष्णानें जाणली. काला होतांच, गडी कृष्णास ह्मणाले–आतां यमुनेवर जाऊं चला. त्यांस हरी ह्मणाला–तहान लागली तर ताक किंवा दूध प्यावें परंतु यमुनेवर जाऊं नये. हात घोंगड्यांस पुसा ह्मणजे झालें. तें वचन सर्वांस मानलें.

मग गडी ह्मणाले–जगज्जीवना ! आज यमुना कां वर्जिली ? कृष्ण ह्मणाला–तेथें विवशी आहे तिची मला भीति वाटते, ती सर्वांस धरून नेईल. पेंद्या ह्मणाला-मी यमुनेवर जाऊन पाणी पिईन. कृष्ण बोलला–तूं नसताच हट्ट घेऊं नको, तुला विवशी गिळून टाकील, आणि जर गेलास तर

गेल्यानें पाणी बाहेर काढून पी. नंतर पेंद्या यमुनेवर येऊन विवशी कोठें आहे ह्मणून पाहूं लागला. तों यमुनेच्या पाण्याचा खळाळा ऐकून पेंद्या तिला बोलला—तूं बायको होऊन आह्मां बरोबर हमामा घालतेस? आतां कशी वागतेस तें पाहतों. जर मी कृष्णदास असेन तरच तुला शांत करीन. असें बोलून हमामा घालूं लागला. तें कळंब-वृक्षाखालीं गोविंदास कळतांच, तो गड्यांस ह्मणाला—पेंद्या यमुनेवर गेला त्याची काय गती झाली ती पाहून या. मग जे समाचारास पाठविले होते तेही पेंद्यास जाऊन मिळाले. गेलेले परत आले नाहींत ह्मणून आणखी पाठविले; तेही त्यांच्या बरोबर हमामा घालूं लागले. अशा नवलक्ष गड्यांनीं यमुनातीर वळकावून हमामा आरंभिला. त्यांचे प्राण कासाविस झाले, तरी हारीस आले नाहींत. ज्यांनीं रामावतारीं वानर होऊन लंकेचें रणकंदन केलें, तेच देवांचे अवतार गोपवेषानें अवतरले. ते यमुनेचें जळ स्थीर राहील तरच शांत होतील.

इकडे कळंबवृक्षाखालीं श्रीकृष्ण एकटाच राहिला होता तो हातांत मुरली घेऊन यमुना तिरावर आला. त्यानें गडी देहावर नाहींत असें पाहून ह्मटलें—अरे! तुह्मीं व्यर्थ कां शिणतां? या खळाळा बरोबर हमामा घालितां, येथें स्त्रीपुरुष प्रतिमा आहे

काय ? असें कृष्ण बोलला, त्यास प्रत्युत्तर कोण देणार ? गड्यांची हमाम्याची घाई चालली होती. मग कृष्ण ह्मणाला–ही यमुना जर न राहील तर हे गडी प्राण देतील. असें जाणून हरीनें मुरली वाजवून सर्वांची चित्तवृत्ति मुरवून टाकिली; त्यामुळें गाई व्याघ्र गजकेशरी यांचा वैरभावही नाहींसा झाला. सर्व चराचर व यमुनेचें नीर स्थीर झालें. तोंच कृष्णानें मुरलींतून आवाज काढिला कीं, ' यमुना भिऊन पळाली, गडेहो स्थीर व्हा. ' तो ध्वनी पेंद्यानें ऐकतांच, मांडी थोपटून आपणास नावाजूं लागला, आणि कृष्णास ह्मणाला–यमुना एका क्षणांत पळविली कीं नाहीं ? कृष्ण बोलला–तुमची करणी अगाध होय. नंतर संध्याकाळ होतांच गोधनें घेऊन वनमाळी गड्यांसह घरीं येण्यास निघाला. त्याला गोपिकांनीं आरत्य व लिंबलोण केलें. वनमाळी घरीं येतांच, घोंगडी काठी टाकून यशोदेच्या गळ्यास मिठी मारिली. बळरामानें रोहिणीच्या गळ्यास मिठी मारिली. नंतर दोघांस आंगधुणें घालून भोजन देऊन मंचकावर निजविलें.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं यशोदेनें दोघांस उठवून, मुखप्रक्षाळन करविलें. नंतर ते गोपाळांसह गाई वत्सें घेऊन वनांत गेले. ते चेंडूफळी, लपंडाई, भोंवरा, विटीदांडू, हमामा, हुंबरी, हुतुतु, आदिकरून अनेक प्रकारचे खेळ खेळून दोनप्रहर होतांच,

वृक्षछायेखालीं गाईवत्सें गोळा करून कळंबवृक्षाखालीं काला मांडिला. तें कौतुक देव विमानांतून पाहात होते.

त्यावेळीं ब्रह्मदेवानें कृष्ण पूर्ण अवतार आहे किंवा अंशरूप आहे, त्याची प्रचिती पाहण्याकारितां, जीं वांसरें वृक्षाखालीं गोळा केलीं होतीं तीं दूर चरत चरत जातांच त्यांवर आपली माया घालून सत्यलोकास नेऊन लपवून ठेविलीं. इकडे गोपाळ कृष्णास ह्मणाले—वांसरें फार दूर गेलीं, आतां वळावयाची पाळी तुझी आहे तरी तूं जाऊन वांसरें वळवून आण मग श्रीहरीनें वेणू पोटांत खोंवून शृंग काठी कांखेंत धरून, डाव्या हातावर दहींभात घेऊन रस्त्यानें खात निघाला. गोपाळ हातांतच ग्रास धरून हरीची वाट पहात बसले. त्यांसही ब्रह्मदेव घेऊन गेला. श्रीकृष्ण वनांत हिंडून पूर्वस्थळीं आला तों तेथें गोपाळही नाहींत. ही ब्रह्मदेवाची करणी हरीस कळतांच हांसून ह्मणाला—आतां ब्रह्मदेवाचा अभिमान दूर केला पाहिजे.

नंतर गाई वांसरें गोपाळ यांचीं रूपें श्रीकृष्ण आपण नटून, सर्वांसह सायंकाळीं गोकुळांत आला. याप्रमाणें एक वर्ष लोटल्यावर, ब्रह्मदेवानें विचार केला कीं, आतां गोकुळांत जाऊन श्रीकृष्ण गाई गोपाळाशिवाय काय करितो आहे तें पाहून यावें. मग गुप्त रूपानें येऊन पाहूं लागला तों सर्व प्रकार पूर्वी सार-

रखाच चालला आहे. असें पाहतांच ब्रह्मदेवाचा अभिमान झडून ह्मणाला—हा माझा जनिता, याचें स्वरूप नेणून गो गोप घेऊन गेलों, तरी आतां यास शरण जावें. नंतर ब्रह्मदेवानें सद्गदीत होऊन, हरीपुढें येऊन साष्टांग नमस्कार घातला, आणि अनन्यभावानें स्तुति करून, अपराधाची क्षमा करावी ह्मणून प्रार्थना केली. तेव्हां कृष्णानें आलिंगन देऊन समाधान केलें आणि अनंत ब्रह्मांडाची रचना दाखवितांच, ब्रह्मदेव समाधिस्त झाला. नंतर सावध होऊन पुनः चरण धरून निजस्थानीं गेला, व गोपवत्सें सोडून दिलीं. कृष्णानें आपली रचना आपणांत जिरविली. ब्रह्मदेवानें वत्सें गोप नेले व सोडून दिले हें चरित्र हरिवांचून दुसरे कोणास कळलें नाहीं. अशा प्रकारें श्रीकृष्ण गोपाळांसह गोकुळांत गाई चारित असे. ब्रह्मदेवानें गो गोप चोरून नेले त्यावेळीं श्रीकृष्ण पांच वर्षांचा होता. पुढें कालियामर्दनाची कथा सांगितली आहे.

अध्याय ११ वा.

कालियामर्दन व बारा गांवें अग्निभक्षण.

एके दिवशीं श्रीकृष्ण गो गोपांसह यमुना तिरावर आला. त्यावेळीं वसंतऋतु चैत्रमासांतील प्रखर उन्हानें गाई गोपाळ

तृषाक्रांत होऊन ज्या डोहांत कालिया दुष्ट सर्प राहत होता तेथें पाणी पिण्याकरितां आले. त्यांनीं पाणी पितांच सर्व गतप्राण होऊन पडलीं. इतक्यांत मागून श्रीकृष्ण तेथें आला. त्यानें पडलेलीं प्रेतें पाहतांच, कृपादृष्टीनें सर्वांस जीवंत केलें.

नंतर जगदीशानें मनांत विचार केला कीं, या कालिंदी डोहांतील दुष्ट सर्पास शिक्षा करून येथून घालविला पाहिजे. याच्या योगानें यमुनेचें पाणी कढत असून, उदकावरून जरी पक्षी गेला तरी तडफडून मरतो, त्याच्या विषपवनानें वृक्षही करपून जातात. त्या डोहांत कालिया येऊन राहण्याचें कारण असें कीं, पूर्वीं सर्व सर्प गरुडास शरण जाऊन ह्मणाले— तूं आमचा संहार करतोस; तर एक अभय द्यावें. गरुड ह्मणाला—मला तुह्मीं प्रतिवर्षीं पूजा द्यावी. तें वचन मान्य करून माघ शुद्ध पंचमीचे दिवशीं एक रथभर अन्नावर एक सर्प ठेऊन प्रतिवर्षी गरुडास देऊं लागले. परंतु उन्मत्त कालिया गरुडास पूजीना, ह्मणून त्यास मारण्याचा गरुडानें विचार केला होता. त्यामुळें लपण्यास कोठें ठिकाणा नसल्यामुळें या डोहांत येऊन राहिला होता. त्या यमुनेंतील मासे गरुड रोज भक्षित असे. तों तेथें सौभरीऋषि तप करित होता त्याला मासे शरण जाऊन आह्मांस गरुड मारतो ह्मणून सांगितलें. तेव्हां ऋषीनें शाप दिला कीं, येथील पाण्याला गरुड स्पर्श करील तर

मृत्यु पावेल. तें गरुडास कळतांच, तेथून निघून गेला व कालिया निर्भय होऊन राहिला. तो नेत्र उघडून जिकडे पाही, तिकडील वृक्षादिक भस्म होत. परंतु तेथें एक कळंब वृक्ष मात्र राहिला होता. याचें कारण गरुडानें अमृतघट नेतांना पळभर त्या वृक्षावर ठेविला होता ह्मणून तो अमर झाल्यामुळें विष-बाधा बाधली नाहीं.

त्या कदंबवृक्षावर कृष्णानें चढून, कालियाचें मर्दन करण्या-करितां यमुनाडोहांत एकदम उडी टाकिली, त्यावेळीं शंभर धनुष्यें पाणी उंच उडालें. देव विमानांत बसून कौतुक पाहण्यास आले. श्रीकृष्णास पाहतांच, कालिया धांवत येऊन वर्मस्थळीं दंश करून अंगास वेढा घातला. तरी श्रीहरी कांहीं न बोलतां उगाच राहिला. यमुना तिरावर गाईगोपाळ आक्रोश करून हांका फोडूं लागले, देव अपार शोकांत पडले, गोकुळांत लो-कांस दुःश्चिन्हें भासूं लागलीं, धरित्री कंपायमान झाली, यशोदा शोकानें विव्हल होऊन स्तन पान्ह्यानें तिडकूं लागले; यशोदा रोहिणी, बळराम घरांत होता तो अशीं बाहेर येऊन जगज्जी-वन कोणत्या वनांत गेला ह्मणून बोलूं लागलीं. असो. नंतर नंद यशोदा आदिकरून मार्ग काढित यमुनातिरावर आलीं; तों गोपाळादिक शोकानें मूर्छित झाले आहेत व भुजंगानें श्रीकृ-ष्णास वेष्टिलें आहे असें सर्वांनीं पाहिलें. त्यावेळीं एकच हांक

होऊन आक्रांत उडाला, त्या शोकाचें वर्णन करणें अशक्य होय. नंतर यशोदादिक सर्वांनीं तेथेंच प्राण देण्याचा निश्चय केला, तेव्हां बळराम आडवा होऊन ह्मणाला–हा त्रिभुवननायक वनमाळी, याला काळाचेंही भय नाहीं. या बळरामाच्या वचनावर विश्वास ठेवून सर्व तटस्थ पाहूं लागलीं.

इकडे कालिंदी डोहांत भुजंगानें श्रीकृष्णास वेढे घालून आवळला होता, त्यापासून सुटण्याकरितां हरीनें आंग फुगविलें; त्याबरोबर कालियाचा देह तडतड वाजून अंगाचे वेढे काढिले व भडभडां गरळ ज्वाळा ओकूं लागला, आणि क्रोधानें दंश करावयास धांवला, तोंच त्या सहा वर्षांच्या कृष्णमूर्तीनें भुजंग धरून, गरगरां फिरवून यमुना जळावर आपटला व शिरावर पाय देऊन शेंपूट हातांत धरून, त्याच्या अंगावर तांडव नृत्य आरंभिलें. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन, जगन्निवासाचें स्मरण करून मूर्च्छित पडला. त्यावेळीं त्याच्या स्त्रिया रत्नदीप आरत्या करीं घेऊन शरण आल्या व पतीचें प्राणदान मागण्याकरितां अनन्य भावानें करुणा भाकूं लागल्या. त्यांची ती करुणा ऐकून कृष्णास दया येऊन कालियामर्दन पुरे केलें. त्यावेळीं देवांनीं वैकुंठनाथाचें स्तवन आरंभिलें. तें भुजंगाच्या कानावर पडतांच, तात्काळ नररूप होऊन चरण धरले व स्तुति केली. ती ऐकून हरी ह्मणाला–आतां वेळ झाला, फार बोलूं

नको. तूं याचवेळीं परिवारासह सागरांत जा. आतां यापुढें तुला गरुडाची भीति नाहीं. कारण माझ्या पदमुद्रा तुझ्या शिरावर उमटल्या आहेत, यास्तव गरुड तुला मारणार नाहीं. तूं सागरांत सुखानें राहा. तुला मी शासन केलें ही लीला जे गातील त्यांस डंख करूं नये. ही कालियामर्दन कथा जे त्रिकाल पढतील त्यांचे दृष्टीनें महाविष उतरेल. नंतर कालियानें श्रीहरीची षोडशोपचारें पूजा करून, आज्ञा वंदन केली आणि सहपरिवारासह सागरांत निघून गेला. तेव्हांपासून यमुना अमृतमय नीरानें वाहूं लागली. मग श्रीकृष्ण वर येतांच सर्वांस ब्रह्मानंद झाला. यशोदा धांवत जाऊन प्रेमानें भेटली. सर्वांच्या भेटी होऊन आनंदीआनंद झाला.

नंतर सूर्यास्त झाल्यामुळें सर्व मंडळी तेथेंच राहून निद्रार्णवीं निमग्न झाली असतां, पूर्वींच कालियाच्या मुखांतील अग्नी वन जाळित होता, तो प्रचंड वाऱ्यानें गौळ्यांवर येऊन सभोंवता अग्नीचा वेढा पडला. त्याबरोबर सर्व मंडळी ओरडत उठली परंतु पळावयास जागा राहिली नाहीं; यांतून कृष्ण कसा वांचेल अशी सर्वांस चिंता पडली. मग गौळ्यांनीं वैकुंठपतीचा धांवा करितांच, कृष्णानें सर्वांस नेत्र झांकावयास सांगितलें. त्याप्रमाणें सर्वांनीं नेत्र झांकतांच, श्रीहरीनें विराट स्वरूप प्रगट करून द्वादशगांवें (अठ्ठेचाळीस कोस) अग्नि भक्षण केला. मग सहा

वर्षाचा होऊन नेत्र उघडण्यास सांगितलें; तों किंचित्‌ही अग्नि राहिला नाहीं. नंतर गौळी आदिकरून हरीस भेटले. मग पहांट होऊन अरुणोदय झाला; त्याबरोबर सर्व मंडळी कृष्णांसह मोठ्या वाद्यगजरानें गोकुळांत आली.

अध्याय १२ वा.

गोवर्धनोद्धार आणि व्योमासुर व अकरा हजार दैत्यांचा संहार.

एके दिवशीं यशोदा रोहिणीनें कृष्ण बलरामास प्रातःकाळीं उठवून, त्यांचें मुख प्रक्षालन करून, जेऊं घातलें. मग ते बाहेर येऊन मुरली वाजवितांच चोहोंकडून गाई गोप येऊन मिळाले. नंदानें गौळ्यांसह मिळून मेघास्तव इंद्राची पूजा करण्याचा विचार करितांच, कृष्णानें नंदास कसला विचार करितां ह्मणून प्रश्न केला. तेव्हां नंदानें इंद्रपूजनाचा विचार कळवितांच, कृष्ण ह्मणाला–इंद्राधीन काय आहे ? प्राणी आपापल्या कर्मानें संसारांत वर्तन करितात, ज्याचें पूर्वकर्म नीट नाहीं त्याला इंद्र काय करील ? ब्रह्मादिकांसही कर्म सोडित नाहीं. यास्तव ब्राह्मण, गाई व आमच्या गाई जेथें चरतात तो गोवर्धन पर्वत याची पूजा करावी. तो विचार सर्वांस मानवून, गौळी कुटुंबास-

हित निघून दहीं, दूध, नवनीत, अन्नें यांचे लक्षानुलक्ष गाडे भरून गोवर्धनाजवळ येऊन पूजा केली. तेव्हां तो मूर्तिमंत पर्वत आपल्या हातानें जेऊं लागला. मग गाईची पूजा करून, कृष्णांस मध्यें घेऊन सर्वांनीं मोठा उत्सव केला.

असें पाहतांच, इंद्रास कोप येऊन, मेघास आज्ञा केली कीं, चंडशिळांचा वर्षाव करून सर्व व्रजवासियांस मारून टाकावें. गौळी मस्त होऊन ते मला लेखीत नाहींत. मग आकाशांतून हस्तीशुंडेसारख्या धारा सुटून तुंबळ पूर चालले, त्यांत सर्व गोकुळ बुडून गेलें. असा भयंकर प्रसंग गुदरतांच, वैकुंठराण्यानें गौळीजनांस नाभीकार दिला, आणि धांवत जाऊन गोवर्धन उचलून सर्वांस तळाखालीं घेतलें. तेव्हां सर्वांस सुख वाटलें. नंतर कृष्ण ह्मणाला— मला भार फार झाला, तरी पर्वत उचलून धरा. त्याबरोबर गौळ्यांनीं पर्वतास जागोजागीं टेंका देऊन कृष्णास ह्मणूं लागले, आह्मीं सर्वांनीं पर्वत उचलला आणि तूं करांगळी मात्र लाविली आहेस. आह्मीं कासाविस झालों व तूं गदगदां हांसतोस ! चोरी करून लोण्याचे गोळे शिदोऱ्या खातोस मग पर्वत उचलावयास कां भितोस ? असें ऐकून मी करांगळी काढूं काय ? असें श्रीहरीनें विचारतांच, काढ ह्मणून गौळ्यांनीं सांगितलें. मग चमत्कार दाखविण्याकरितां

करांगुली ढिली करितांच, पर्वत करकर वाजून खालीं येतांच, गौळी हांका मारूं लागले व काकुळतीस आले. तेव्हां हरीनें वर उचलून धरला.

असा अद्भुत प्रताप पाहून, यशोदेनें कृष्णाच्या गळ्यास मिठी मारिली व गौळणी लिंबलोण करून चरणीं लागल्या. सात दिवसपर्यंत वृष्टी होतांच, गौळी मेले असतील असें समजून इंद्रानें मेघास वृष्टी बंद करण्यास सांगितली. नंतर कृष्णानें गोवर्धन खालीं ठेवून सर्वांस भेटला. मग गोकुळवासी जन श्रीहरीची स्तुति करित गोकुळांत आले.

नंतर एके दिवशीं इंद्रानें विमानांतून गोकुळाकडे पाहिलें. तों गोकुळ पूर्वीसारखेंच गजबजलेलें आहे असें पाहून श्रीकृष्ण-पूर्णब्रह्म अवतार असून, मजपासून अंतर पडून त्याला क्षोभविला; असें त्याच्या मनाला वाटून आतां काय करावें अशा विचारांत पडला. मग ब्रह्मा, ऋषि, देवगण, नारद, तुंबर यांसह श्रीहरीस शरण आला. त्याला श्रीकृष्ण ह्मणाला—तूं उगाच अभिमानास कां पेटलास ? तरी तुला ही आठवण दिली आहे. यापुढें सावधपणाचें वर्त्तन ठेवून, स्वरूपीं सावध होऊन, सृष्टिकार्य करावें. मी सज्ञान झालों हा अभिमान धरूं नये. अशा प्रकारें श्रीधरानें बोध करतांच, इंद्रानें अनन्यभावें स्तुति केली, व षोडशोपचारें पूजा करून, वस्त्रालंकार अर्पण

केले आणि आज्ञा मागून गमन केलें. हें गोवर्द्धनोद्धारण भावार्थें ऐकल्यानें संकट दुःखवार्ता नाहींशा होऊन, ब्रह्मानंदपद हातास येतें.

एके दिवशीं यमुनेच्या तिरावर मुरारी गाई चारित असतां, एक नवल वर्तलें; तें असें कीं, मयासुराचा पुत्र व्योमासुर त्याला कंस ह्मणाला—आमचा वैरी थोर झाला असून, गाई चारण्याकरितां यमुना तिरावर येत असतो, तरी तेथें जाऊन त्याचा वध करावा. तें वचन मान्य करून वृंदावनास येऊन, गोपाळरूप धरून कृष्णदासांत येऊन मिळाला आणि कृष्णास ह्मणाला—गडी वांटून वाघ मेंढी खेळूं या. मग तो असुर वाघ होऊन गोपाळांस पळवून पर्वतविवरांत कोंडून ठेवूं लागला. गाई वांसरेंही ठेविलीं. शेवटीं एकटा चक्रपाणी राहून मुरली वाजवित रानोमाळ गाई गोपाळांचा शोध करूं लागला. तों पर्वतदरींतून हंबरणें ऐकूं आलें, गोपाळांनीं आक्रोश करून कृष्णाचा धांवा मांडला; तेव्हां श्रीहरीनें मुखांतून चक्र काढून पर्वत फोडला व गाई गोपाळांस बाहेर काढिलें; तोंच व्योमासुर प्रळय हांक देऊन हरीस ग्रासावयास धांवत आला. त्याबरोबर त्याचें चक्रानें शीर उडविलें. असा पुरुषार्थ करून पूर्वस्थळीं येऊन काला मांडला.

ही वातमी कंसास कळतांच, अकरा हजार दैत्य कृष्ण

बळरामास धरून आणण्यास पाठविले. त्यांनीं येतांच गोपाळांस वेढा घालून, बळराम सांवळा कोठें आहेत ह्मणून विचारूं लागले, तोंच गोपाळ भयभीत झाले. त्यांस अभय देऊन, कृष्ण दैत्यांस ह्मणाला—तुह्मांस कोणी धाडिलें ? ते ह्मणाले—तुह्मांस धरून आणण्याकरितां, कंसानें पाठविलें आहे. श्रीहरी ह्मणाला—कंस मूर्ख आहे, त्यानें इतके कशाला पाठविले ? तुह्मीं दोघे-जण राहा आणि बाकीचे परत जा; आह्मीं जेऊन तुमच्या बरोबर येतों. तें वचन त्यांस मानवून फक्त दोघे राहून, बाकीचे मागें परतले. नंतर राहिलेल्या दोघांस बळरामानें आजन्मपर्यंत न विसरतील असें ताडण केलें. सर्व गोपाळही डांगा घेऊन उठले. तेव्हां ते काकुळतीस येऊन पुनः येणार नाहीं असें बोलूं लागतांच, त्यांस सोडून दिलें.

तेव्हां ते भीतीनें पळत सुटले, त्यांस पुढें अकरा हजार जात होते ते भेटतांच, रिकाम्या हातीं कां आलेत ह्मणून विचारूं लागले. ते ह्मणाले—आह्मांस त्यांनीं जें भोजन घातलें तसें आजन्मपर्यंत जेवलों नव्हतों. बळीभद्रानें आपल्या हातानें फार अन्न वाढलें. मग त्यांस कसें धरून आणावें ? असें ऐकतांच, त्या सर्व दैत्यांस अन्नाची आशा सुटून आह्मांस अन्न देतील काय ? असें विचारूं लागले. त्यांनीं सांगि-तलें—अन्न इतकें आहे कीं, तुह्मांस तुमच्या, पितरांस व देवां-

सही पुरून उरेल. आतांच जा पाहूं ? असें ऐकतांच, तो दैत्य-भार हरिजवळ आला. त्यांस पाहतांच गोपाळ भयाभीत झाले. त्यांस तुम्हीं भिऊं नका असें कृष्णानें सांगितलें. मग श्रीहरीनें वर पाहतांच अक्रा हजार गंधर्व खालीं उतरले, त्यांत चित्रसेन मुख्य होता; त्यानें वंदन करून आज्ञा विचारतांच, 'या दैत्यांस भोजन घाला,' असें कृष्णानें सांगितलें, त्याबरोबर अक्रा हजार दैत्यांचें कंदन केलें. जीवंत राहिले ते मथुरेंत पळून गेले. तेव्हां मथुरानगर हडबडून लोक चावळल्यासारखें बडबडूं लागले. नंतर गंधर्व कृष्णाची स्तुति करून निजस्थानीं गेले. घायाळ कंसास सांगूं लागले कीं, कंसा ! तुझें मरण जवळ आलें ! असें ऐकतांच, कंस श्वासोश्वास टाकित काय करावें अशा विचारांत पडला. इकडे नंदास बातमी कळली कीं, अक्रा हजार वीर येऊन रामकृष्णास घेऊन गेले. त्याबरोबर नंदादिक गोकुळवासी वनांत आक्रंदत आलीं. तोंच राम कृष्ण गाई गोपाळांसह घरीं येण्यास मागें परतले. त्यांस पाहतांच जो ब्रह्मानंद झाला तो कोण वर्णू शकेल ? मग नंदानें समारंभ करून अपार दानें दिलीं.



कालियामर्दन.

Joshi Art P. Works, Bombay 1.

अध्याय १३ वा.

शक्तिपूजन, देवांतक व पितृद्रोहीवध, रंगारी, माळी यांस ताडण व असुरासुरवध.

एके दिवशीं यमुनातिरावर सर्व गोपाळ मिळून कृष्णास सांडून अनेक प्रकारचे निरनिराळे खेळ मांडिले. त्यांस कृष्ण ह्मणाला–तुमच्या गाई रानोमाळ लागल्या आहेत त्या आधीं वळून आणून मग खेळ मांडा. असें जगदोद्धार बोलतांच, गोपाळ गाई वळावयास धांवले. परंतु एकही गाय त्यांस वळली नाहीं. असे गोपाळ श्रम पावून, शेवटीं श्रीहरीस शरण आले. तेव्हां त्यास दया येऊन, मुरली वाजवितांच सर्व गाई गोळा झाल्या. मग सर्व गोपाळांनीं कृष्णाभोंवता कदंब वृक्षाखालीं मोठा आनंदाचा गोंगाट केला. पेंदा ह्मणाला–या सृष्टींत पूर्वीं पुष्कळ खेळगडी झाले, त्यांच्याच पोटांतील खेळ आह्मीं खेळत आहों. गडी ह्मणाले–ते कोण कोणते सांग पाहूं ? पेंदा बोलला सांगतों ऐका–पूर्वीं षडानन, नारद, शुक, अंबऋषि, ध्रुव, रुक्मांगद, शिबी, हरिश्चंद्र, प्रल्हाद, बळी, बिभीषण, हनुमंत इत्यादि पुष्कळ खेळगडी झाले, त्यांतील किंचित सांगितले. असें बोलणें चाललें आहे तों सायंकाळ होऊन चक्रपाणी सर्वांसह गोकुळांत येण्यास निघून सर्व घरोघर गेले.

एकदां शक्तिचतुर्दशी येतांच, लोक हरिस्मरण विसरून घरोघर देवीचें पूजन करूं लागले. जाखाई, जोखाई, मायराणी, मारको, मेसको, यक्षिणी, आग्या, झोटींग, जखणी, कर्णपिशाच, भगलिनी, उच्छिष्टा, चांडाळिनी, रानसटवी, वेताळ, मुंज्या, काळरजनी इत्यादि दैवतास भजूं लागले. सारांश, हरिभजन सोडून क्षुद्र दैवतांचें पूजन करितांच, श्रीकृष्णनाथ कोपून सर्व जनांस भ्रांत करून रस्त्यावर नग्न फिरावयास लाविलें. नंद यशोदा मात्र सावध होतीं. असें पाहतांच नंद कृष्णास ह्मणाला—यांस आतां काय करावें ? हरि ह्मणाला—विष्णुभजनास विन्मुख झाल्यामुळें अशी गती झाली. नंतर विष्णुनामस्मरण करतांच तें विघ्न दूर झालें.

इकडे मथुरेंत कंस चिंताक्रांत असतां, देवांतक व पितृद्रोही पैज बोलले कीं, आह्मीं व्याघ्र होऊन वनांत बसून, रामकृष्णास भक्षण करूं. असें ऐकतांच, त्यांचा गौरव करून वस्त्रालंकार देऊन गोकुळांत जाण्यास आज्ञा दिली. ते दोघे व्याघ्र होऊन वृंदावनांत टपत बसले होते. त्या दिवशीं रामकृष्ण वनांत आले नव्हते ह्मणून ते दोघे ह्मणाले—आज जर आपण गोपाळांस भक्षण करूं तर उद्यां रामकृष्णास वनांत पाठविणार नाहींत; मग ते स्वस्थ बसले. गोपाळांनीं वाघ पाहतांच गाई गोकुळाकडे पिटून नेल्या. ती बातमी नंदादिकांस

कळतांच, रामकृष्णास बाहेर जाऊं देऊं नका अशी यशोदा रोहिणीस ताकीद दिली. त्या त्यांचें रक्षण करीत असतां, कृष्ण ह्मणाला-माते ! आह्मीं दोघे रस्त्यावरून खेळून येतों. असें सांगून नजर चुकवून वनांत जाऊन दोघांनीं दोन गदा मुखांतून काढून त्यांचा चेंदा केला, आणि त्यांचीं चामडीं काढून गोकुळांत येण्यास निघाले. इकडे माता व नंदादिक रामकृष्णाचा शोध करूं लागलीं, तों कोठेंच पत्ता लागेना. मग नंदासह गौळी वनांत चालले, तों दोघांस समोरून येतांना पाहिलें. त्यांच्या हातांतलि कातडीं पाहून हीं कोठून आणलींत ह्मणून नंदानें विचारिलें. ते दोघे ह्मणाले-दोन वाघ मरून पडले होते त्यांचीं कातडीं सोडवून आणिलीं. नंद ह्मणाला-यांनींच वाघ मारिले असतील. मग त्यांस घरीं घेऊन आले.

एके दिवशीं श्रीहरी गड्यांसह कालिंदीतिरीं खेळत असतां, कंसाचे रंगारी वस्त्रें रंगवित होते, त्यांच्याजवळ गेले. त्यांस बलरामानें विचारिलें येथें कोणाचीं वस्त्रें रंगवित आहां ? ते ह्मणाले-तुह्मां गौळ्यांस विचारण्याचें कारण कोणतें ? तुह्मां गुराख्यांस मी एकटा ताडण करीन व कंसास कळतांच, तुमचें गोकुळ उरूं देणार नाहीं. असें बोलतांच बलराम कोपून वस्त्रें घेऊन, ताडण करून पळवून लाविलें. त्यांनीं ती बातमी कंसास कळवितांच, कंसाचें मन दचकून विचारांत पडला. तीं वस्त्रें राम-

कृष्णांनीं सर्व गोपाळांस वाटलीं. नंतर सायंकाळ होतांच, गोपाळ आनंदानें हरिचरित्रें गात घराकडे वळले. त्यांस येतांना पाहतांच, गोकुळवासियांस वाटलें कीं, हें कंसाचें सैन्य आलें ह्मणून सर्व गौळी बाहेर निघाले. नंतर नंदानें गोपाळांस ओळखून रामकृष्णास कोणाचीं वस्त्रें आणलीं ह्मणून विचारिलें. कृष्ण ह्मणाला—आह्मीं यमुनातिरीं खेळत असतां, रंगारी भिऊन वस्त्रें टाकून पळाले. तीं आह्मीं घेऊन आलों, रानांतच टाकून यावें तर तें तुह्मांस मानवलें नसतें.

आणखी एके दिवशीं बलराम व कृष्ण कंसाचे बागेंत जाऊन, कंसाचे दूत फुलांचे हार भरून घेऊन चालले होते, त्यांस ताडण करून सर्व फुलें घेऊन गोकुळांत आले. त्यांस मातेनें विचारिलें हीं कोणाचीं फुलें हिरावून आणिलींत ? कृष्ण ह्मणाला—जननी ! आज पंचमी आहे, तरी तुला नाग पूजण्याकरितां हीं फुलें आणिलीं आहेत. तिकडे फुलें नेल्याची बातमी कंसास कळतांच, तो मनांत भयाभीत झाला; तोंच जळासुर कंसास ह्मणाला—मी यमुनेच्या डोहांत जाऊन बसतों व तुझ्या शत्रूस गिळून टाकतों. असें ऐकतांच, कंसानें जाण्याची आज्ञा दिली. मग तो दैत्य यमुनाडोहांत लपून कृष्णाची वाट पाहात बसला होता. नंतर गोपाळांसह कृष्ण जलक्रीडेस येऊन, डोहांत उडी टाकून जळासुरास शोधूं लागला.

तोंच जळासुरानें कृष्णास मिठी मारून, दोघांचें मल्लयुद्ध झालें. शेवटीं कृष्णानें त्याची मान पिळून प्राण घेतला; त्याबरोबर यमुनेचें पाणी लाल झालें. गोपाळ जलक्रीडा करून, बाहेर येऊन पाहातात तों कृष्ण कोठें दिसेना. तेव्हां ते हांका फोडून वक्षस्थळें बडवून घेऊं लागले. तोंच कृष्णानें जळासुराचें प्रेत नागपाशानें बांधून बाहेर ओढून काढिलें. त्याला पाहतांच गोपाळांस आनंद झाला. मग रामकृष्ण गोपाळांस ह्मणाले– आह्मीं जळासुर वधिला असें गोकुळांत सांगूं नका. आह्मीं पुढें जातों. तुह्मीं हें प्रेत गोकुळांत ओढून आणा. नंतर दोघांनीं कांखेस घोंगड्या मारून यशोदेजवळ येऊन रडूं लागले. तेव्हां गाई टाकून पुढें कां आलेत? ह्मणून आईनें विचारिलें. ते ह्मणाले–आज आमच्या गड्यांनीं यमुनेंतून वागूल ओढून काढिला आहे, त्याला पाहतांच आह्मीं भिऊन पळालों. असें सांगतांच, मातेनें दोघांस पोटाशीं धरून, अंगावरून उतारा केला. मग गोपाळांनीं तें प्रेत ओढित गोकुळांत आणितांच, लोकांस त्याचें भय वाटलें. गोपाळ ह्मणाले–आह्मीं सर्वांनीं यास मारून तुह्मांस दाखविण्यास आणिला; बलराम व कृष्ण यांस पाहून भिऊन पळाले.

जळासुर मेल्याची बातमी कंसास कळतांच, त्यास दचक बसला. मग दूत पाठवून जळासुराचें प्रेत आणवून पुरून टाकि

नंतर असुरासुर प्रतिज्ञा करून, शत्रूस जिवंत धरून आणतों असें सांगून गोकुळांत जाण्यास निघाला. त्यास कंस ह्मणाला— आजपर्यंत जे प्रतिज्ञा करून गेले ते पुनः मागें आले नाहींत, यावरून तुझ्या वचनाचा मला विश्वास वाटत नाहीं. असें ऐकून तो दैत्य ह्मणाला—माझा मृत्यु हनुमंताच्या हातीं असून, राम अवतार संपल्यापासून तो कोठें गेला त्याचा पत्ता नाहीं. तो आतां कोठून येईल. तरी मला जाण्यास आज्ञा द्यावी. मग तो यमुनेच्या काठीं जेथें गड्यांसह कृष्ण बसला होता तेथें आला. त्याला पाहतांच, गोपाळ थरथर कांपूं लागले, त्यास अभय देऊन, कृष्णानें त्याचा मृत्यु जाणून, मारुतीचें चिंतन केलें. त्यावेळीं मारुती सेतुबंधनीं समाधिस्त होता, त्याच्या कानीं शब्द पडतांच उड्डाण करून श्रीहरीजवळ येण्यास निघाला. इकडे कृष्णानें गाई गोपाळ गुप्त करून, आपण श्रीराम व बलराम लक्ष्मण होऊन बसले. तोंच मारुतीनें येऊन चरणांवर मस्तक ठेवून, आज्ञा विचारिली. श्रीरामानें सांगितलें—तो पहा असुर आमचेवर येत आहे त्याचा मृत्यु तुझ्या हातीं आहे तरी त्याचा संहार कर. अशी आज्ञा होतांच, मारुती धांवत गेला. त्यास पाहतांच असुर मनांत ह्मणाला—माझा हा शत्रु अकस्मात् कोठून आला ? आतां मी याचेपुढें वांचत नाहीं. नंतर उभयतांचें तुंबळ युद्ध होऊन, मारुतीनें त्याचा प्राण घेतला.

नंतर मारुतीनें विचारिलें कीं, पुनः स्वामीचें आगमन होण्याचें कारण कोणतें ? श्रीराम ह्मणाला—बारे ! हा कृष्ण अवतार पण तुझ्याकरितां रघुवीर झालों. हा शेष लक्ष्मण तोच बळिराम झाला आहे. असें ऐकतांच लक्ष्मणास भेटला, आणि पुनः प्रार्थना केली कीं, तुमचा गोपाळवेष पाहण्याची माझी इच्छा आहे. नंतर मारुतीस गोपाळांसह कृष्णरूप दाखविलें. तें पाहून वंदन करून मारुती स्वस्थानीं गेला. नंतर सूर्यास्त होतांच, गोकुळांत येण्यास निघाले. गोपाळांनीं नंदास सांगितलें कीं, वनांत हनुमंत आला होता, त्यानें असुरासुराचा संहार केला व दक्षिण सागरास निघून गेला. असें ऐकतांच गौळ्यांस आश्चर्य वाटलें.

अध्याय १४ वा.

अघासुर, धेनुकासुरादि दैत्यवध, नंदाचें वरुणलोकीं जाणें, अजगरानें गिळणें, कोडें उगविणें व गोवर्धन जाळणें.

कंसास पंचभूतें व चराचर प्राणी कृष्णरूप दिसूं लागले. त्यामुळें तो रात्रंदिवस चिंताक्रांत असतां, अघासुर नांवाचा दैत्य ह्मणाला—मी तुझ्या शत्रूस गिळून टाकीन. असें ऐकतांच

कंसानें त्याचा गौरव करून जाण्यास आज्ञा दिली. तो दैत्य विशाळ अजगर होऊन, पर्वतासारखा शंभर योजनें लांब व बारा गांव मुख पसरून, वनांत जाऊन पडला. ती पर्वतदरी असें समजून नवलक्ष गोपाळ आंत संचरले. श्रीकृष्ण मागें राहिला होता, त्यानें तें राक्षसाचें कपट जाणून तोही आंत शिरला, तोंच त्यानें दोन्हीं जाभाडे मिटले. त्याबरोबर गाई गोपाळांनीं आक्रांत करून कृष्णाची प्रार्थना केली. तेव्हां कृष्णानें विशाळ रूप धरून दैत्य उभाच चिरून टाकला. नंतर सूर्यास्त होतांच, सर्व गोकुळांत परतले; हें वृत्त नंदादिकांस कळतांच आश्चर्य वाटलें.

नंतर कंसानें धेनुकासुर पाठविला. तो ताडवनांत बैल होऊन बसला. तें मुकुंदानें जाणून गोपाळांसह खेळ खेळण्यास तिकडे जाऊन त्याचा प्राण घेतला. मग केशी असुर अश्वरूपानें गौळी लोकांचीं घरें होतीं तिकडे आला. त्यास पाहतांच गोकुळवासी भीतीनें कपाटें देऊन बसले. तेव्हां हरी त्याच्यावर धांवत जाऊन, त्याच्या बरोबर झुंजून शेवटीं त्याच्या कुक्षीपर्यंत तोंडांतून हात घालून, जीभ पिळून प्राण घेतला. अशी बातमी कंसास कळतांच, त्यानें धरणीवर आंग टाकिलें. नंतर प्रलंबासुरास वृषभ वेशानें पाठविला त्याचेंही हरीनें पक्वफळासारखें चूर्ण केलें.

त्यानंतर एके चांदणे रात्रीं बलराम व चक्रपाणी गोपिकांसह कालियामर्दन बनांत खेळत असतां, शंखचूड दैत्य गोवेषानें येऊन गाईसारखी ध्वनी काढूं लागला. त्याच्या पाठीस राम-कृष्ण लागतांच, व्याघ्ररूपानें पळतां पळतां त्याचा पाठलाग करितांच भयंकररूपें प्रगट करून उभे राहिले. त्यांचा तरुघा-तानें चुराडा केला.

पुढें एकादशी येतांच, नंद व्रतस्थ असतां, अरुणोदयीं उठून यमुनेवर स्नानास गेला. तेथें जळपती वरुणाचे दूत अकाळीं जलांत प्रवेश करणारास धरून नेत असत, आणि श्रीकृष्ण हा आदिनारायण किंवा अंशरूप आहे याची परिक्षा पाहण्याकरितां, दूतांकडून नंदास पाताळांत आणविलें. इकडे सूर्योदय झाला तरी नंद येत नाहीं असें पाहून यमुनेंत बुडाला किंवा काय ? अशाबद्दल यशोदादिक शोकांत बुडून शोध करूं लागलीं. तेव्हां कृष्णानें सर्वांचें समाधान करून, यमुनेवर येऊन, आंत उडी टाकून वरुणलोकांत गेला. त्यास वरुण शरण येऊन, अपरा-धाची क्षमा मागून पूजन करून नंदास आणून दिलें. मग नंदास घेऊन श्रीहरी गोकुळांत आला. तेव्हां सर्वांस ब्रह्मानंद झाला.

एके दिवशीं नंद शक्तिवनांत देवीच्या यात्रेकरितां सर्व गो-कुळवासी जनांसह येऊन पूजन करून तेथेंच वस्ती केली. दोन प्रहर रात्र होतांच, सर्व मंडळी निद्रेंत असतां, एक महा सर्प

(अजगर) नंदाजवळ येऊन, त्यास गिळूं लागला. त्यावेळीं कृष्ण यशोदेजवळ निजला होता. अजगरानें नंदास कंठापर्यंत गिळतांच, नंदानें हांक फोडिली. तोंच कृष्णानें धांवत येऊन, सर्पास उभाच चिरून नंद्रास सोडविलें. त्याचक्षणीं सर्पशरीरांतुन दिव्य पुरुष निघून, हात जोडून ह्मणाला—मी पूर्वी सुदर्शन नांवाचा विद्याधर परम विषयांध स्त्रियांसह जलक्रीडा करीत असतां, ऋषींचा मेळा आला; त्यांची मी निंदा केली. त्यांनीं सर्प होऊन पडशील असा शाप दिला. मग उःशाप मागतांच, शक्तिवनांत कृष्णचरणानें मुक्त होशील असें सांगितलें. ती वेळ आज आली. असें बोलून सुदर्शन निजस्थानीं गेला. मग सर्व गोकुळांत आल्यावर नंद यशोदा कृष्णाचे चरणीं लागून तूं आमचा देव असें ह्मणूं लागलीं. तेव्हां कृष्ण स्फुंदस्फुंदून रडत मला देव ह्मणूं नका असें बोलत असतां, यशोदेनें आलिंगन दिलें.

इकडे मथुरेंत कंससभेंत नारदमुनींची स्वारी आली. त्याची कंसानें पूजा केल्यावर, नारदानें सर्व वर्तमान सांगून ह्मटलें—दोघे पुत्र व रोहिणीला वसुदेवानें गोकुळांत चोरून ठेविलीं आहेत. ते नंदाच्या घरीं बलराम कृष्ण थोर झाले असून, त्यांनींच तुझ्या दैत्यांचा संहार केला. असें ऐकतांच, कंस क्रोधानें डोळे फिरवून, वसुदेवदेवकीला ठार मारतों, असें बोलून शस्त्र घेऊन, बंदिशाळेजवळ आला. त्याला नारद ह्मणाला—या

द्धांस जर मारशील तर लोकांत तुझी अपकीर्ति होईल. यास्तव रामकृष्णास शोधून मार असें सांगून मागें फिरविलें. अशी नारदानें कळ लावून, दोघांस सोडवून आपण सभेंत येऊन बसला. मग कंस क्रोधानें कालयवन, शिशुपाळ, वक्रदंत, बाणासुर, भौमासुर इत्यादिकांस हांक फोडून ह्मणाला—माझे सखे हो ! उग्रसेन चुलता देवक धरून आणून शृंखला घाला, यादवांस जिवें मारून, विष्णुभक्तांस धरून, गाई ब्राह्मणांचा संहार करा; सर्व यज्ञ मोडून, कोणास अनुष्ठान करूं देऊं नका, ऋषि धरून आणा. त्यांचा मी संहार करीन ! नंतर यादव गिरिकंदरीं लपून बसले, ऋषि आश्रम टाकून अवनी ठाव दे असें बोलूं लागले. कंसाचे दूत वनोवनीं हिंडून गोब्राह्मणांचा घात करूं लागले. असो.

मग नारद गोकुळांत येऊन कृष्णास नमन करून ह्मणाला—कंसानें गाई ब्राह्मण गांजिले, यास्तव आतां कंसास लौकर वधून टाक. असें सांगून ऊर्ध्वपंथें निघून गेला. नंतर कंसानें वत्सासुर दैत्य पाठवितांच, त्यानें वांसराचा वेष घेऊन गाईंत चरूं लागला. त्याला कृष्णानें पायीं धरून आपटून मारिलें.

एके दिवशीं कृष्ण गौळ्यांस ह्मणाला—कंस फार विघ्नें करितो याकरितां गोकुळ वोस करून वृंदावनीं जाऊन राहा. पण गौळ्यांस घरांची आशा सुटेना. मग रामकृष्ण स्वर्गांतिल

गिर्वाण भाषा बोलून, कांहीं मुलें बरोबर घेऊन गोकुळाबाहेर गेले आणि आपल्या मस्तकावरील कुरळ केश तोडून टाकून त्यांचे लांडगे उत्पन्न करून, पोरांसह गोकुळांत पळाले व लांडगे पिसंळले ह्मणून सांगून, त्याचवेळीं गोकुळ खाली करून सर्वांस वृंदावनास नेलें. तेथें वाडे करून परिवारासह राहिले.

नंतर रामकृष्ण यमुनातिरीं गोपाळांसह खेळत असतां, कंसानें प्रलंबासुर पाठविला. तो गोपाळवेष धरून कृष्णदासांत मिळाला. प्रलंबावर डाव येतांच, बलरामास आपल्या पाठीवर बसवून अरण्यांत घेऊन चालला. त्याला तूं कोठें नेतोस ह्मणून बळरामानें विचारिलें. पण न बोलतां मथुरेच्या मार्गास लागला; तोंच त्यास ओळखून रोहिणीसुतानें त्याचें मुष्टिघातानें चूर्ण केलें व कृष्णाजवळ येऊन वृत्तांत कळविला.

प्रलंबासुर मेल्यावर कंसानें बकासुरास पाठविला, तो बगळा होऊन यमुनेवर कृष्णाची वाट पाहात बसला. गड्यांनीं त्याची बातमी कृष्णास सांगतांच, कृष्ण जवळ गेला तोंच चंचूनें उचलून गिळून टाकिलें. तेव्हां गोपाळांनीं वक्षस्थळ बडवित आकांत केला. बकासुरास श्रीकृष्ण तापलेल्या गोळ्यासारखा जाळूं लागल्याबरोबर तसाच ओकून बाहेर टाकिला. त्याच्यामागून अरिष्टासुर शक्तिरूपानें येतांच हरीनें योगमाया प्रगट करून शक्ति गिळून टाकिली. तें कौतुक पाहून गडी ह्मणूं लागले— श्रीहरी ! तुझी अगाध माया असो.

मग कागासुर माझा मृत्यु वीरभद्राचे हातीं आहे असें कंसास सांगून वृंदावनांत आला. त्यास कृष्णानें जाणून वीरभद्राचें स्मरण करतांच, वीरभद्रानें त्वरित येऊन शीर उडविलें आणि कृष्णास नमन करून निघून गेला. नंतर खरासुर, खगासुर, विठ्यासुर आले, त्यांचाही अंत केला.

नंतर कंस राज्य बुडालें, भरंवशाचे वीर गेले, असें बोलत वक्षस्थळ बडवून घेऊं लागला. मग त्याला एक बुद्धि सुचून, दूता हातीं घागरी व कोहाळे पाठवून घागरींत कोहाळे भरावे व वाळूच्या दोऱ्या वळून पाठवून द्याव्या. हें कोडें न उगवेल तर रामकृष्णास धाडून द्यावें नाहींतर गोकुळाचें निर्दालन करीन. असा निरोप देऊन दूत नंदाकडे पाठविले. त्यावेळीं गौळी वृंदावनाहून गोकुळांत परत राहण्यास आले होते, तोंच हें विघ्न ओढवलें. त्यामुळें सर्वांस चिंता पडली. त्यावेळीं रामकृष्ण वनांत गेले होते ते सायंकाळीं परत येतांच हा वृत्तांत कळला. तेव्हां ते गदगदां हांसून ह्मणाले–हें कोडें आतां उगवूं ! चला उठा भोजन करा. बळराम ह्मणाला–पडत्या आकाशास आह्मीं धीर देणारे, त्या आह्मांपुढें कंस मशक तें काय ? मग गोपाळानें घट आणून त्यांत कोहाळे घातले व बळरामानें रेती आणून वळून घटास बांधिली.

नंद कंसदूतास ह्मणाला–तुमचें कोडें उगवलें हें नेऊन

कंसास दाखवा. दूत बोलले—तुह्मांस मथुरानाथानें बोलाविलें आहे. असें बोलतांच बळिभद्र संतापून त्यांस मारावयास उठला; तेव्हां ते काकुळतीस आले. तें कोडें दूतांनीं कंसाजवळ आणून दिलें व कृष्णानें कोहळे घटांत भरले व बलरामानें वेंट वळले असें सांगितलें. तें ऐकतांच कंसास भय उत्पन्न झालें.

त्यानंतर एके दिवशीं गोवर्धन पर्वतावर मुरारी गाई चारित होता, सूर्यनारायण मध्यान्हीस येऊन गवतें शुष्क झालीं होतीं. अशा संधींत कंसाच्या दूतानें पर्वतास चोहोंकडून अग्नि लाविला. त्यांत नवलक्ष गाई गोपाळ हरिसह सांपडतांच, गाई गोपाळांनीं आकांत केला. तोंच श्रीकृष्णानें सर्वांस नेत्र मिटावयास सांगून अग्नि भक्षण केला. त्यानंतर संध्याकाळ होतांच गोकुळांत आले.

अध्याय १९ वा.

वसुदेवदेवकीस कृष्णभेट, राधाविनोद व गोपीवस्त्रहरण.

एकदां श्रावण महिन्यांतील रविवार अमावास्येच्या दिवशीं रोहिणीनें बळरामाची व यशोदेनें श्रीकृष्णाची पूजा करून वाणें दिलीं. तों मथुरेंत बंदिशाळेंत वसुदेव देवकीनें श्रीकृष्णास आ-

ठवून अपार दुःख केलें. देवकी बोलली—कंसानें माझीं बाळें मारल्यामुळें आज एकही वाण द्यावयास उरलें नाहीं. मी सात पुत्र विऊन वांझ झालें व आठवा चक्रपाणी झाला तोही मला अंतरला. आतां आज वाण कोणाला देऊं ? असें बोलून वैकुंठनाथाचा धांवा केला. त्यावेळीं श्रीकृष्ण गोकुळांत गड्यांत खेळत असतां, करुणावाणी ऐकून गुप्तरूपानें मथुरेंत येण्यास निघाला. इकडे देवकीनें वाण विस्तारून, कृष्णाचें चिंतन करून जेथें माझें बाळ असेल, तेथें हें वाण पावो, असें बोलतांच, कृष्ण आईचे पाठीमागें येऊन उभा राहिला. मग आईनें वाण उचलून, अतीत कोण आहे? ह्मणून विचारलें. तेव्हां कृष्ण ह्मणाला—सर्वातीत मी आहें. देवकी मागें पाहूं लागली तों सांवळी मूर्ती दृष्टीस पडली. तेव्हां देवकीनें तूं कोणाचा बाळ ? माझाही कृष्ण तुझ्या एवढाच झाला असेल असें ह्मटलें. तें ऐकून जगज्जीवन हांसून ह्मणाला—माते ! तुझा पुत्र तोच मी कृष्ण ! असें बोलतांच स्तनास पान्हा फुटला; त्याबरोबर यादवरायास आडवें घेऊन स्तनपान करविलें. नंतर वसुदेवानें आलिंगन दिलें. मग त्यांची समजूत घालून, तुमची लवकरच सुटका होईल असें सांगून, श्रीकृष्ण गोकुळास आला.

नारद कंससभेंत जाऊन ह्मणाला—अरे ! कृष्ण मातापित्यास भेटून गेला, तो समाचार तुला कळला काय ? असें ऐकतांच

दृताकडून वसुदेव देवकीस सभेंत आणून, त्यांचा वध करण्यास सेवकांस हुकूम दिला. तेव्हां देवकीनें श्रीहरीचा धांवा केला. त्यावेळीं कृष्ण गोकुळांत गोपाळांच्या मेळ्यांत खेळत होता, त्यानें धांवा ऐकतांच, मुखांतून सुदर्शन काढून वसुदेव देवकीच्या संरक्षणार्थ फेंकून दिलें. तें मथुरेंत येऊन डोळ्याचें पातें लवतें तितक्या वेळांत वसुदेव देवकी भोंवतीं शंभर फेरे फिरूं लागलें. त्यानें दैत्यसैन्याचा संहार करून शिरांच्या राशी पडल्या. असें पाहतांच कंस भयाभीत होऊन यांस ईश्वर रक्षितो आहे असें समजून त्यांस बंदिशाळेंत जाण्यास सांगितलें. मग तीं बंदिशाळेंत गेलीं. अशी करणी करून सुदर्शन आपल्या स्थानीं गेलें.

त्या नंतर एके दिवशीं श्रीहरी वृंदावनांत खेळत असतां, गौळणी गोरस विकावयास मथुरेस चालल्या. त्यांच्या मध्यभागीं राधा होती, तिला श्रीकृष्णानें पाहतांच, वडज्यास ह्मणाला–वृक्षावर चढून गौळणी कोण कोण जात आहेत तें पहा. वडज्या पाहून ह्मणाला–पुष्कळ गौळणी चालल्या आहेत, परंतु त्यांत एक सुंदर कामिनी असून, ती घडीघडी तुजकडे पाहात आहे. तिला धरून दान माग. मग गड्यांसह वनमाळी धांवत जाऊन, राधेचा पदर धरिला. तेव्हां तिनें डोळ्यांनीं खुणाविलें कीं, आतां भलतेंच बोलूं नको. हरि ह्मणाला–आमचें दान दिल्याशिवाय जाऊं देणार नाहीं. राधा

बोलली–तूं तनाना करूं नको, नाहींतर चावडीवर नेईन आणि कसलें दान मागतोस तें दिवाणाला विचारीन. हरी बोलला–तूं चावडीची आवडी धरतेस ? तर मग दान घेतल्यावांचून सोडणार नाहीं. राधा–आतां दान घेशील ? कृष्ण–नाचत देशील. नाहींतर आडमार्गानें कुंजवनांत चल. राधा–तुझी जीभ फार बरळते, पण तुला ठकवून जाईन. कृष्ण–मासा गळांत गुंतल्यावर तो कसा सुटून जाईल ? तशीच तूं. राधा–हें वर्तमान कंसास कळलें तर तुला गोकुळांत राहूं देणार नाहीं. कृष्ण–कंसास एका क्षणांत मारून, चाणूर, मुष्टीकास पळांत आपटून टाकीन; मग तूं आमची नोवरी होशील ना ? असें बोलतांच इतर गौळणी हांसूं लागल्या.

राधा–अरे ! तुझा पुरुषार्थ मला ठाऊक आहे, तुला बायकांनीं उखळांशीं बांधावें, कांखेस घोंगडी घेऊन गाई राखाव्या व पांवा वाजवून गोपाळांशीं हमामा घालावा ! तो तूं कंसाचा वध काय करतोस ! असें ऐकून पेंधा ह्मणाला–कृष्ण परमपुरुष, याचा महिमा जाणत नाहींस ? हे दोघे शेष नारायण देवकार्याकरितां अवतरले आहेत. पूतना, शटकासुर, केशी, तृणावर्त्त, अघासुर, यांस मारून कालियाचें मर्दन केलें ! बारा गांवें अग्नि गिळिला ! नखाग्रीं गोवर्धन धरिला ! नंदास सर्पमुखांतून सोडविला ! असे हरीचे गुण न जाणतां तुह्मीं मूर्ख गौळणी त्यास दूषण ठेवितां ?

असें ऐकून राधेची सखी चंद्रकला श्रीहरीस ह्मणाली–गोपाळा, आमचे अन्याय क्षमा कर. चोरी करून तुझें पोट भरत नसेल तर आमचे जवळ गोरस मागून घे. वाटेस आडवून पीडा देऊं नको; राधेला सोड जाऊं दे. असें बोलून चरण धरले. मग राधा चंद्रकलेस ह्मणाली–हा असाच भलते-वेळीं पीडतो, हा माझ्या गाई राखितो ह्मणून मी यास बोलत नाहीं. नाहींतर याचे कान उपटून हातावर दिले असते! कृष्ण ह्मणाला–तुझ्या बापाचें मी काय खाल्लें आहे ? आजपासून तुझ्या गाई मी राखणार नाहीं. असें ऐकतांच राधा शरण आली; तिचा प्रेमा पाहून श्रीहरी ह्मणाला–तुमचा भाव हाच गोरस नित्यकाळीं अर्पण करित जा. तें वचन मान्य करून, गोपी मथुरेस जाऊन, गोरस विकून गोकुळांत आल्या.

यानंतर एकदां यमुना तिरीं श्रीकृष्ण गाई चारित असतां गौळ्यांच्या कुमारी मुलींनीं कृष्णसंगाकरितां कात्यायनी व्रत आरंभिलें. तेव्हां हेमंतऋतु मार्गशीर्षाचा महिना होता. त्या कुमारी अरुणोदयीं स्नान करून, सूर्योदय होतांच, वाळूच्या कात्यायनी मूर्ती करून, मनांत श्रीकृष्ण आठवून पूजा करित असत. त्यांचें व्रत पूर्ण करण्याकरितां गोपाळांच्या मेळ्यांतून एकटाच श्रीकृष्ण त्यांच्याजवळ आला. त्यावेळीं अवघ्या वस्त्रें यमुनातिरीं ठेऊन, पाण्यांत

पोंहत होत्या; तों सर्व वस्त्रें घेऊन श्रीहरी कदंबावर जाऊन बसतांच एकीनें पाहिलें. तिनें सर्वजणींस सांगतांच त्या लाजून गळ्यापर्यंत पाण्यांत बुडून, कृष्णाची अनेक प्रकारें प्रार्थना करून वस्त्रें मागूं लागल्या. श्रीहरी त्यांस ह्मणाला– ही पवित्र सूर्यकन्या तींत तुह्मीं नग्न होऊन कशा शिरलांत ? आतां आपल्या घरीं जा, मी तुमचीं वस्त्रें आणून पोंचवीन. मग त्यांनीं नाना प्रकारें विनवणी करितांच, बाहेर येऊन सूर्यास नमस्कार करा, कळंबाखालीं क्षणभर नाचा ह्मणजे तुमचीं वस्त्रें मिळतील, असें कृष्णानें सांगितलें. नंतर त्यांनीं निरुपायास्तव बाहेर येऊन लज्जा सोडून सूर्यास नमस्कार केला. तेव्हां त्यांचीं वस्त्रें अर्पण केलीं. मग त्या ह्मणाल्या–भुवनसुंदरा ! आमचा काम तुझ्या संगानें शांत करावा. असें ऐकून आत्मारामानें सांगितलें–शरद्ऋतूंतील चांदण्या रात्रींत मी वृंदावनांत मुरली वाजवीन, तेथें तुह्मीं सर्वजणींनीं यावें ह्मणजे तुमची कामना पूर्ण होईल. असें सांगतांच गोपी घरास गेल्या.

अध्याय १६ वा.

श्रीकृष्ण पूर्ण अवतार असून, त्यानें गोकुळांत पराक्रम करून दाखविले; इंद्र ब्रह्मदेव शरण आले ! असा प्रताप जाणत असतां,

गोकुळांतील ब्राह्मण निंद्रेंत प्रवर्तून ते ह्मणूं लागले या कृष्णानें कर्मभ्रष्ट होऊन गोकुळ सर्व बाटवून टाकिलें. आह्मीं उंच वर्णाचे सोंवळे ब्राह्मण असून आमच्या दीक्षेनें सर्व वर्तन करितात. तरी आपण दूर जाऊन राहावें; असा विचार करून कुटुंबासहित अरण्यांत यमुनातिरावर जाऊन राहिले. तेथें तृणाचे मांडव घालून, राजाचें आर्जव करून द्रव्य मागून आणून, यज्ञशाळा रचून यज्ञास आरंभ केला. तेव्हां श्रीकृष्णानें असें केलें कीं, एके दिवशीं प्रातःकाळीं गाई सोडून शिदोऱ्या न घेतां तसाच वनांत गेला. त्यांच्या मागून गोपाळही लगबगीनें शिदोऱ्या शिवाय निघून कृष्णास मिळाले व त्यांनीं खेळ मांडला. नंतर सर्वांस भूक लागतांच, शिदोऱ्या सर्व विसरून आलों, आतां काय करावें ह्मणून कृष्णास विचारूं लागले. तेव्हां श्रीहरी गड्यांस ह्मणाला—त्या पहा यज्ञशाळा दिसतात, तेथें आमच्या गांवचे ब्राह्मण यज्ञ करीत आहेत त्यांचे जवळ जाऊन सांगा कीं, आह्मीं शिदोऱ्या आणावयास विसरलों, बलराम कृष्णही भुकेले आहेत तरी आमच्या सर्वांपुरतें अन्न द्यावें.

असें श्रीहरीचें वचन ऐकून, गोपाळ घोंगड्या व काठ्या घेऊन यज्ञशाळेंत येऊन, ब्राह्मणांस नमन करून, सर्व वृत्तांत निवेदन केला आणि अन्न मागूं लागले. तें त्यांचें वचन ऐकतांच, ब्राह्मण कोपून ह्मणाले–हे गोवळे येथेंही आह्मांस भ्रष्ट

करावयास आले. मग एकमेकांस खुणावून प्राणांत झाला तरी यांस अन्न द्यावयाचें नाहीं असा निश्चय केला. मग त्यांचें अंतर जाणून गोपाळ निराशेनें कृष्णाजवळ येऊन सर्व वृत्तांत निवेदन केला. तेव्हां कृष्ण गड्यांस ह्मणाला–ब्राह्मण अविद्येनें ग्रासल्यामुळें मला ओळखीत नाहींत तरी आतां त्यांच्या स्त्रियांजवळ जाऊन अन्न मागा. असें ऐकतांच गोपाळ दुसऱ्या वाटेनें पाकशाळेशीं आले तों स्त्रिया श्रीहरीचें चिंतन करीत बसल्या होत्या. त्यांस गोप ह्मणाले–श्रीकृष्ण वृंदावनांत क्षुधेनें व्याकुळ झाला आहे. त्यानें तुमच्याजवळ अन्न मागितलें आहे. ब्राह्मणांनीं आह्मांस छळून लाविलें ह्मणून तुमच्याजवळ पाठविलें आहे.

असें ऐकतांच, ब्राह्मणस्त्रिया सद्गदीत होऊन बोलूं लागल्या कीं, श्रीकृष्ण पूर्ण अवतार त्यास न ओळखून ब्राह्मण मायेनें व्यापले आहेत. तरी आह्मीं संसारावर पाणी घालूं पण त्यांस अन्न देऊं. असें बोलून अन्नाचे हारे भरून कृष्णदर्शनास चालल्या. त्यांतील एक क्षणभर मागें राहून अन्न भरून निघाली तोंच तिचा नवरा पाकशाळेंत आला, त्याला सर्व स्त्रिया कृष्णभेटीस गेल्या असा वृत्तांत कळतांच, आपल्या बायकोस ताडण करून ह्मणाला–मूर्खे ! वेद, देव, ब्राह्मण व अग्नी यांच्यासमक्ष तुझ्या बापानें माझ्या हातीं दिली असतां, माझी भक्ति सांडून गोवळ्यास पूजावयास चाललीस ? असें बोलून बांधून ठेविली.

तेव्हां ती ह्मणाली—तूं या देहाचा पती ! तो देह आपले घरीं जतन करून ठेव. असें सांगून अंतरांत कृष्णध्यानाचें चिंतन करून प्राण सोडला. सर्व स्त्रिया गेल्या असें ब्राह्मणांस कळ-तांच ते ह्मणूं लागले, आतां त्या परत येतील तर त्यांस घरांत घ्यावयाच्या नाहींत. ज्यानें आपल्या बायकोस बांधून ठेविलें होतें, तो हर्षानें सांगू लागला, मी आपल्या बायकोस अटकावून ठेविली. नंतर तो तिजजवळ येऊन तिचें समाधान करून ह्म-णाला—तुला मी अलंकार घडीन, रागाऊं नको. डोळे उघडून माझ्याजवळ बोल पाहूं ? ती कांहींच बोलेना ह्मणून श्वास पाहूं लागला तों तिचा प्राण गेलेला पाहून शोक करूं लागला. तेव्हां ब्राह्मण ह्मणाले—अरे ! रडतोस कशाला ? तूं प्रेत तरी पाहात आहेस, आह्मीं आपल्या स्त्रिया गोवळ्यांस अर्पण केल्या त्या मागें येणार नाहींत.

जिनें हरीकरितां प्राण सोडला, तिचा लिंगदेह वृंदावनांत श्रीहरीजवळ जाऊन भोंवूं लागला. मग हरीनें देह निर्माण क-रून पड्रसान्नाचें पात्र भरून दिलें. तीच सर्व जणींच्या पुढें गेली. तिला पाहतांच स्त्रिया बोलूं लागल्या, हिला भ्रतारानें अ-टकविली होती, ती पुढें कशी आली? नंतर त्या स्त्रियांनीं गोपाळांसह श्रीहरीस अन्न अर्पण करून तृप्त केलें. त्यांस वैकुंठ-पती ह्मणाला—अंतीं तुह्मीं माझ्या पदीं याल व तुमच्या पतींस

असंख्य जन्मपंक्ती घ्याव्या लागतील. नंतर त्यांस बोध करून आश्रमास जाण्यास सांगितलें. तेव्हां त्या ह्मणाल्या—आतां आमचे पती प्राण घेतील यास्तव तुमचे चरण सोडणार नाहीं. कृष्णानें सांगितलें—तुह्मी घरीं जाऊन नवल तर पहा, तुमचे पती तुमचे पाय वंदन करतील. मग जिचा प्राण गेला होता ती हरिपदास मिळून गेली व बाकीच्या आश्रमास आल्या. त्यांस ब्राह्मण ह्मणूं लागले—धन्य तुमचें जिणें. नारायणानें तुमचेवर कृपा केली व आह्मीं अभिमानानें नाडलों! भगवंत भाविकांस दर्शन देतो व अभाविकांस कोटी वर्षें शोधल्यानेंही प्राप्त होत नाहीं. आह्मीं परब्रह्माची निंदा केली! अशा प्रकारें ब्राह्मण सद्गदीत होऊन, हरिचरणीं मिठी घालूं चला असें बोलूं लागले. तों कंसाचे दूत गोब्राह्मणांस मारतात असा समाचार एकानें सांगितला; तो ऐकून ते भयभीत होऊन, नारायणा! तुझ्या पायास अंतरलों असें बोलूं लागले. कित्येक ह्मणाले—जिनें हरीकरितां प्राण दिला ती धन्य सती होय. ती अनुष्ठान, तप न करितां नारायणपदास पावली. नाहींतर आह्मीं व्यर्थ पढून वैकुंठनाथाची निंदा केली. असे आह्मीं जाणून वेडे झालों.

अध्याय १७ वा.

रासक्रीडा.

ऋषिपत्न्या कृष्णनाथास अन्न अर्पण करून, आश्रमांत गेल्यावर, एके दिवशीं शरद ऋतूंतील चांदण्या रात्रीं वृंदावनांत श्रीकृष्णानें मुरली वाजवून, गोपिकांचें मन मोहून टाकिलें. मुरलीचा ध्वनी कानीं पडतांच, गोकुळांतील स्त्रिया मोहित होत्सात्या, कामधंदा तसाच टाकून हरिदर्शनास निघाल्या व वृंदावनांत कृष्णाभोंवत्या गोळा झाल्या. त्यांस कृष्ण ह्मणाला—तुह्मीं आपला गृहधर्म व पतीस टाकून येथें कशाला आलांत ? आपला पती ईश्वर मानून त्यास निरंतर भजावें. असें ऐकतांच, गोपी सद्गद होऊन ह्मणाल्या—आह्मीं संसारतृष्णा सोडून तुझ्या चरणीं शरण आलों आहों. जर एकदृष्टीनें पाहिलें तर तूंच आमच्या पतींच्या अंतरांत आहेस. असा त्यांचा अंतरभाव जाणून मोक्षदानी वश होऊन रासमंडळ रचून खेळूं लागला. एकेक गोपी जवळ एकेक कृष्ण अशीं हजारों रूपें श्रीकृष्ण नटून गोपींबरोबर नाचूं लागला. ज्या त्या गोपीस वाटूं लागलें कीं, माझ्या जवळच भगवंत आहे. ज्या कामिनीचें जसें मन तसाच जगमोहन होऊन सुख देत असे.

अशा कामिनी नाचून दमल्यावर हरिकंठीं मिठ्या मारून, सुरतयुद्धास सुखशयनीं प्रवर्तल्या. गोपींच्या वदनावरील

श्रमबिंदु श्रीकृष्ण आपल्या पितांबरानें पुसित असे. हरीचें अधरामृत सेवन करीत असतां, गोपिकांचा काम दुष्पट होऊन, आंगचा चंदन ठायीं ठायीं पुसत असे. अशी क्रीडा करून घर्म येतांच यमुनाजळांत खेळ खेळत असत. नंतर एक कामिनी ह्मणाली—पुनः चला वनांत खेळावयास जाऊं. तें त्याचें वचन मानून, त्याच्या मनाप्रमाणें वागत असे. श्रीकृष्णानें गोपींबरोबर जी क्रीडा केली तशी आपण करूं असें जे नर ह्मणतील ते अज्ञान पामर घोर नरक भोगतील.

त्यानंतर पुनः रासमंडळ रचून ज्या गोपीचें जसें मन त्याप्रमाणें आपण होत होता. एकीला कडेवर घेई, एक कृष्णाचे मांडीवर मस्तक ठेवी, रुसलेलीची समजूत करी, एकीचें वदन कुर्वाळी, एकीच्या अंगावर अंग टाकून निजे. अशा अनेक क्रीडा करित असतां, गोपींस अभिमान होऊन कृष्ण आपल्या सांगण्याप्रमाणें चालतो असें बोलूं लागल्या. असा त्यांस अभिमान झालेला पाहून, श्रीकृष्णानें आपलीं असंख्य रूपें गुप्त केलीं. त्यावेळीं गोपी चमकून अपार शोक करूं लागल्या. वनांतील पशु, पक्षी, वृक्ष यांस तुह्मीं चक्रपाणी पाहिला काय ह्मणून विचारूं लागल्या, पण शोध लागला नाहीं. मग सर्व गोपी गोळा होऊन, श्रीकृष्णलीलेचीं नाना कौतुकें करून दाखवूं लागल्या. त्या अशा कीं—